**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**परिपत्रक क्र. ३०७/२०२३**

**विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाबाबत**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील मा.प्राचार्य/मा.संचालक यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ५६(२)(ख) नुसार प्रत्येक महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था यांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे त्यांचेवर बंधनकारक आहे. याबाबत सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था सोबत जोडलेल्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

सदर विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाची कामकाजविषयक कार्यकारी यंत्रणा महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजाची कार्यकारी यंत्रणा) एकरूप परिनियम, २०१९ अन्वये विहित केलेली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०८(१)(क) अनुसार अधिनियम आणि त्याखालील परिनियम, आदेश व विनियम यांच्या तरतुदींचे आणि विद्यापीठाच्या व राज्य शासनाच्या स्थायी आदेशांचे आणि निर्देशांचे अनुपालन करणे प्रत्येक संलग्नित महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेवर बंधनकारक आहे.

तरी प्रत्येक संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्थांनी उपरोक्त नमूद महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदींचे तसेच महाराष्ट्र शासनाने विहित केलेल्या सदर एकरूप परिनियमातील तरतुदींचे अनुपालन करून विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याची तातडीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष) यांना सदर पत्राच्या दिनांकापासून आठ दिवसांचे आत सादर करावा. ज्या संलग्नित महाविद्यालयांनी व मान्यताप्राप्त परिसंस्थांनी अशा प्रकारच्या विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाची स्थापना केलेली आहे त्यांनी देखील त्याबाबतचा अहवाल विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष) यांना सदर मुदतीत सादर करावा.

विद्यापीठाच्या सदर निर्देशांचे अनुपालन न केल्यास संबंधित संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेविरूध्द संलग्नीकरणाच्या/मान्यतेच्या अटींचा भंग केल्याच्या कारणास्तव आवश्यक आणि समुचित कारवाई करण्यात येईल.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जा.क्र.: सीए/2767 )
दिनांक : 07/12/2023 )

07/12/2023
(स.द.डावखर)
उपकुलसचिव
**शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)**

प्रत:

१. मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये
२. मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच.डी.
संचालक

संदर्भ क्र.:विविमं/२०१८–१९/१०२९

दि. ०४/०४/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थां.

विषय : महाविद्यालयीन विद्यार्थी विकास कक्ष स्थापना.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक ०१ मार्च, २०१७ पासून अंमलात आलेला असून सदर अधिनियमात विद्यार्थी कल्याण मंडळाचे नामकरण विद्यार्थी विकास मंडळ असे झाले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार विद्यापीठामध्ये जी प्राधिकरणे अस्तित्वात आली आहेत त्यापैकी कलम २६ नुसार विद्यार्थी विकास मंडळ हे एक प्राधिकरण आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ५६(२)(क) नुसार महाविद्यालये व संस्थेत विद्यार्थी विकास कक्ष स्थापन करणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध पैलूंमधील व त्यांचे शैक्षणिक कार्य व्यक्तिमत्व विकास व निकोप जीवनाशी संबंधित इतर पैलू यामधील प्रश्न व अडचणी यांमध्ये साहाय्य करण्यासाठी प्रत्येक महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थेत एक विद्यार्थी विकास कक्ष स्थापन करण्याचे निर्देश महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ मध्ये दिलेले आहेत.

महाविद्यालय कक्षाच्या प्रमुखपदी उपप्राचार्य किंवा प्राचार्यांनी नामनिर्देशित केलेला वरिष्ठ अध्यापक असेल आणि अध्यापक महिला, अध्यापक सामाजिक कार्यकर्ता, समुपदेशक यांचा समावेश करण्यासाठी प्राचार्यांने नामनिर्देशित केलेले इतर चार सदस्य असतील आणि महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचे पदाधिकारी हे पदसिद्ध सदस्य असतील.

त्याअन्वये महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ कलम ५६(२)(क) नुसार आपल्या महाविद्यालयात/ परिसंस्थेत विद्यार्थी विकास कक्षाची स्थापना करावी. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच.डी.
संचालक

संदर्भ क्र.:विविमं/२०१८–१९/११२८ दि. ३०/०५/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : विद्यार्थी तक्रार निवारण नियमावली व प्रक्रियेचे पालन.

संदर्भ: १. विश्वविद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे D.O.F. No.14-4/2012(CPP-II) Dt.07/05/2019 चे पत्र.

२. या विभागाचे संदर्भ क्र. विविमं/२०१८–१९/१०२७, दि. ०४/०४/२०१९ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, विश्वविद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी विद्यार्थी तक्रार निवारणासंदर्भातील नियमावलींचे राजपत्र प्रकाशित करण्यात आले आहे. याबाबतचे पत्र व नियमावली आपल्या माहिती व कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. या नियमावलीच्या कलम ८(I) नुसार सदर नियमावली प्रकाशित झाल्यापासून तीन महिन्याच्या आत विद्यार्थी तक्रार निवारणाचे ऑनलाईन पोर्टल तयार करणे आवश्यक आहे, असे निर्देशित केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत सन २०१९ चा एकरूप परिनियम ५ मधील ५(३) अनुसार महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांना उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये महाविद्यालय तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत यापूर्वीच सूचित केले आहे.

विश्वविद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त परिसंस्थेत विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या नियमावलीनुसार आपण आपल्या स्तरावर काटेकोरपणे प्राधान्याने कार्यवाही करावी. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. संतोष परचुरे**
**संचालक**


संदर्भ क्र. विविमं / २०२१-२२ / ११८ 	दि. २०-१२-२०२१

प्रति,

**मा .प्राचार्य / मा. संचालक**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
असलेली सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय :** महाविद्यालयीन तक्रार निवारण कक्षाबाबत..

**संदर्भ :** १ . या विभागाचे संदर्भ क्र. विविमं/२०१८-१९/१०२७, दि. ०४/०४/२०१९ चे पत्र
२ . या विभागाचे संदर्भ क्र. विविमं/२०१८-१९/११२८, दि. ३०/०५/२०१९ चे पत्र

महोदय/महोदया,

महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सुलभ व पूरक शैक्षणिक प्रशासकीय प्रणालीची निर्मिती विकसन व निश्चिती याबद्दल आपण सतत कटिबद्ध असतो. विद्यार्थ्यांना कोणत्याही स्तरावर उद्धवणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी महाविद्यालयातील सर्वच घटकांची सहकार्याची व पूरक भूमिका असते. विद्यार्थी विकास कक्षाच्या माध्यमातून सर्व महाविद्यालयीन घटकांचा विद्यार्थ्यांशी सुसंवाद सुनिश्चित करण्यासाठी आपल्या स्तरावर विशेष यंत्रणा कार्यरत असतात.

विद्यार्थी तक्रार निवारण यंत्रणेबाबत विश्वविद्यालय अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात कायदे, नियम, अधिनियम, परिनियम इत्यादी माध्यमातून निर्देश दिलेले असून त्याच्या काटेकोर अंमलबजावणीबाबत आपणांस यापूर्वीच संदर्भीय पत्रांद्वारे कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार

१) आपल्या शैक्षणिक परिसरात विहित पद्धतीने विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करावा. सदर कक्ष, त्याचे स्वरूप व कार्य याबाबतीत महाविद्यालय परिसरात दर्शनी भागातील फलक, संकेतस्थळ इत्यादी माध्यमातून विद्यार्थ्यांना ठळकपणे माहिती द्यावी.

२) महाविद्यालय यंत्रणा व विद्यार्थी यांच्या मध्ये विसंवाद टाळण्यासाठी विद्यार्थ्यांचे वेळोवेळी विविधस्तरावर समुपदेशन करावे.

३) तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजातील पारदर्शिता व सुलभीकरणाच्या दृष्टीने ऑनलाईन प्रणाली देखील विकसित करणे आवश्यक असून आपल्यास्तरावर त्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

कळावे, ही विनंती.

Parchure

डॉ.संतोष परचुरे
संचालक
विद्यार्थी विकास मंडळ


भ्रमणध्वनी : ०९२७२७२७९९९, ०८२७५५१५३५४, ईमेल : sdparchure@gmail.com, bsd@unipune.ac.in
कार्यालय: ०२०–२५६२२६८०, ०२०–२५६२२६८४, संकेतस्थळ : http://www.unipune.ac.in/bsd